महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६४७४२११ विस्तारीत - ३६४२ दूरभाष : २६५८ १५१६
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## वृत्तपत्र टिप्पणी

## महानिर्मितीचा शिर्सुफळ, ता. बारामती येथे ५० मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प

### शासन-खाजगी सहभाग प्रारुपातून उभारला जाणारा देशाच्या ऊर्जाक्षेत्रातील पहिला वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प

महानिर्मिती शिर्सुफळ, ता. बारामती येथे ५० मेगावॅट क्षमतेचा ग्रीड कनेक्टेड तंत्रज्ञानावर आधारित सौर ऊर्जा प्रकल्प उभारणार असून शासन-खाजगी सहभाग प्रारुपातून (Public-Private Partnership Model) उभारला जाणारा हा प्रकल्प त्याच्या खात्रीशीर महसुली परताव्याच्या तरतुदीमुळे देशाच्या ऊर्जाक्षेत्रातील अशा प्रकारचा पहिला वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प ठरणार आहे. देशाच्या ऊर्जाक्षेत्रात या नवीन संकल्पनेचा स्वीकार करणारी महानिर्मिती ही पहिली वीजनिर्मिती कंपनी ठरली आहे. या प्रकल्पाची संपूर्ण मालकी महानिर्मितीची आहे. एकीकडे या प्रकल्पात महानिर्मितीची पूर्ण भांडवली गुंतवणूक होणार नसूनही आगामी तब्बल २५ वर्षांसाठी खात्रीशीर वीजनिर्मितीसह खात्रीशीर महसुली परतावा हे या संकल्पनेचे वैशिष्ट्य आहे.

महानिर्मितीने राबविलेल्या आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेतून हा प्रकल्प उभारणीचे काम महानिर्मितीला जास्तीत जास्त महसुली परतावा देणाऱ्या मे. वेलस्पन एनर्जी लि. यांना देण्यात आलेले आहे. सदर कंपनी महानिर्मितीला पुढील २५ वर्षांसाठी ३८.७५% या प्रमाणात खात्रीशीर महसुली परतावा देणार असून प्रकल्पातून होणाऱ्या खात्रीशीर वीजनिर्मितीसाठीचे प्रमाण १९% सी.यु.एफ. (Capacity Utilization Factor (CUF)) इतके निर्धारित करण्यात आलेले आहे. महानिर्मिती सदर ५० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी एकूण सुमारे १५० कोटी इतकी गुंतवणूक करणार असून उर्वरित भांडवली गुंतवणूक, मे. वेलस्पन एनर्जी लि. यांनी करावयाची आहे. सदर प्रकल्पासाठी डिझाईन, अभियांत्रिकी, उत्पादन व सामुग्री पुरवठा, उभारणी, चाचणी व प्रकल्पाचे कार्यान्वयन यासाठीची संपूर्ण जबाबदारी तसेच पुढील तब्बल २५ वर्षांसाठी या प्रकल्पाचे संचलन व सुव्यवस्था यासंबंधीची सर्व जबाबदारी मे. वेलस्पन एनर्जी लि. यांचेवरच असणार आहे. वीजनिर्मितीत घट झाल्यास त्याची भरपाई करण्याची जबाबदारी देखील सदर कंपनीवरच राहील.

सदर प्रकल्प दोन टप्प्यांत उभारला जाणार असून सध्या पहिल्या टप्प्यात महानिर्मितीने संपादित केलेल्या ७४.७४ हेक्टर क्षेत्रात ३६ मेगावॅटचा सौर प्रकल्प उभारण्यात येणार आहे. उर्वरित १४ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी शिर्सुफळ परिसरात सुमारे २९.९७ हेक्टर जमीन संपादित झाल्यानंतर प्रकल्पाची उभारणी करण्यात येईल.

महानिर्मितीला सदर प्रकल्पासाठी इंडो-जर्मन सहाय्य योजनेअंतर्गत मे. के.एफ.डब्ल्यु., जर्मनी यांनी अत्यंत माफक व्याजाने वित्तीय पुरवठा (Soft Loans) करण्याचे मान्य केले आहे. आगामी काळात देखील याच संकल्पनेच्या धर्तीवर कौडगांव, जि. उस्मानाबाद तसेच अन्यत्र जमीन उपलब्धतेनुसार सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा महानिर्मितीचा मानस आहे.

सदर ५० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पातून प्रतिवर्षी सुमारे ८३ दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती अपेक्षित आहे.

शिवाजीनगर, ता. साक्री येथील १२५ मेगावॅट क्षमतेचा देशातील सर्वात महाकाय सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित केल्यानंतर या नूतन संकल्पनेद्वारे महानिर्मिती बारामती येथे सौर प्रकल्प उभारत आहे.

---

दिनांक : ०४/०३/२०१४.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक / वृत्तवाहिनी

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**